**<u>प्रेसनोट दिनांक-२४/०८/२०१९</u>**

**<u>समर्थ पोलीस स्टेशन पुणे</u>**

**तडीपार गुंडास  समर्थ पोलीसांनी घेतले ताब्यात .**

दिनांक २३/०८/२०१९ रोजी सोमवार पेठ पोलीस चौकीचे पोलीस उप निरीक्षक श्री.व्ही.एस. मोहिते , पोलीस शिपाई शाम सुर्यवंशी , महिला पोलीस हवालदार माया गाडेकर व पोलीस हवालदार धोत्रे नेमणूक समर्थ पोलीस ठाणे पुणे हे श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त सायंकाळी बंदोबस्त पेट्रोंलिंग करीत असताना सदानंदनगर , मंगळवार पुणे पुणे शहर या ठिकाणी आले. तेव्हा त्यांना स्थानिक बातमीदाराने  समर्थ पोस्टे कडील रेकॉर्डवरील गुंड व तडीपार  गुन्हेगार नामे - सागर भुजंग नायडू वय -  रा. सदानगदनगर , मंगळवार पेठ पुणे हा तडीपार आदेशाचा भंग करुन सदानंदनगर येथे आला आहे .त्यानुसार त्याचा शोध घेत असताना टूरिस्ट हॉटेल जवळ सांगर नायडू हा उभा असलेला दिसून आला . पोलीसांना पाहून तो पलायन करीत असताना त्यास लक्ष्मण जाधव नावाचे स्थानिकाचे मदतीने उक्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी  रात्रौ. ८-३० वा. नमूद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी पकडले. त्यास मा. पोलीस उप आयुक्त , परिमंडळ  - २ पुणे शहर  यांनी पुणे शहर व जिल्हयातून दोन वर्षाकरीता महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम  ५६(१)(अ)(ब) अन्वये दिनांक १६/३/२०१९ रोजी तडीपार आदेश क्र. १६/२०१९ अन्वये तडीपार केलेले होते. त्याचेकडे त्याने परत येणेसाठी मा. पोलीस उप आयुक्त , परिमंडळ  -२  पुणे यांची परवानगी घेतली आहे काय याची खात्री केली . तेव्हा त्याने अशी परवानगी घेतलेली नसल्याची खात्री झाली.

यामुळे नमूद तडीपार गुंड सागर भुजंग नायडू वय – २३ वर्षे रा.ए/२४१, सनं. ११ , सदानंदनगर, मंगळवार पेठ पुणे याने तडीपार आदेशाचा भंग करुन सदानंदनगर मंगळवार पेठ पुणे येथे दिनांक  २३/८/२०१९ रोजी रात्रौ. ८-३० वा. आलेला असताना मिळून आल्याने त्याचे विरोधात पोलीस शिपाई शाम सुर्यवंशी नेमणुक - समर्थ पोलीस ठाणे ,पुणे  यांनी महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम १४२ अन्वये तक्रार नोंद केल्याने समर्थ पोस्टे गुरनं. २५४/२०१९ महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम  १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येऊन त्याला पोलीस उप निरीक्षक श्री. व्ही.एस. मोहिते , समर्थ पोलीस ठाणे पुणे शहर यांनी अटक केली आहे .

--------------------------------